# १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या १५० वर्षांहून जास्त गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१ हा गेल्या एकवीस वर्षांपासून यशस्वीपणे कार्यरत आहे. मुंबई या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महानगरात मुख्यत्वे करुन मुंबई-अहमदाबाद महामार्ग तसेच पश्चिम द्रुतगती मार्ग या रस्त्यावरुन वाहतुक येते. सदरचे रस्त्यावरील बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर बांधण्यात आलेल्या अंधेरी येथील उड्डाणपूल प्रकल्प हा सार्वजनिक बांधकाम विभागातील मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा(पूर्व), मुंबई या विभागाच्या कार्यकक्षेत येतो. पश्चिम उपनगराकडील वाढलेल्या वसाहतींमुळे रस्त्यावरील वाहतुक प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा (पूर्व), मुंबई येथे कार्यरत असून समस्त महाराष्ट्रातील नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा (पूर्व), मुंबई या सनदेद्वारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शित केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभुतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोण विचारात घेऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

१. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबईतील पश्चिम मुक्त मार्गासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन करुन त्यावरील बाधीतांचे पुनर्वसन करणे.

२. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाशी संबंधीत भुसंपादन न्याय प्रविष्ठ प्रकरणे, दावे व आवश्यक पाठपुरावा. महसुल विभाग पुणे व रायगड यांचेशी समन्वय तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे सोबत पाठपुरावा करणे.

३. ह्या विभागीय कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

४. ह्या विभागीय कार्यालयाच्या व मंडळाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

ह्या विभागाच्या कार्यालयात व मंडळाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

६. ह्या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

७. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत ह्या विभागाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित विभागीय स्तरावर त्वरित कार्यवाही करणे.

८. कार्यालयांच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून ह्या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे

९. संगणकीकरणाबाबत ह्या विभागाच्या सर्व मंडळाअंतर्गत विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरित उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

१०. ह्या विभागांतर्गत आवश्यक व अद्ययावत विविध माहिती त्वरित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्ययावत करणे.

११. सर्व विषयांची अनुसुची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१२. कार्यालयांमध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्ययावत करणे.

१३. हुडको / एल.आय.सी. अर्थसहाय्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सर्व प्रादेशिक विभागामध्ये रस्ते व पुलांचे कामे पुर्ण करण्यात आली. यासाठी राज्य शासनाने फेब्रुवारी-२००१ मध्ये कर्जसहाय्य घेतले. या योजनेअंतर्गत पुर्ण झालेल्या कामांवरील खर्चाचे व्याज व मुद्दल परत फेडीचे धनादेश हुडको / एल.आय.सी. यांना या विभागामार्फत मासिक/त्रैमासिक विवरणपत्र सादर केले जातात. या परतफेडीचे संनियंत्रण व आवश्यक लेखे ठेवण्याचे काम विहीत कालावधीमध्ये करणे.

१४.नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. ह्या विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी.

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र मंडळ, मुंबई

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

## ➢ **नागरिकांची जबाबदारी**

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांची स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
- नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## ३. विभागीय कार्यालयाचे ड़कार्यक्षेत्र

या विभागास निश्चित असे कार्यक्षेत्र नाही. मुंबई जवळील मुख्य / महत्वाची कामे या विभागाकडे दिले जातात. तसेच सदर विभाग हा एकात्मिक विभाग असलेने उप विभाग व विभाग यांची एकत्र आस्थापना आहे.

१. या विभागामार्फत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे कामाकरिता भूसंपादनाची कामे करण्यात आली असून त्या अनुषंगाने खाणी व साठवणीकरिता संपादन केलेल्या जमिनींचेबाबतीत दावे, दाव्यांबाबत पाठपुरावा तसेच अनुषंगीक कार्यवाही व महसुल विभाग पुणे व रायगड यांचेशी सर्वतोपरी समन्वयाची कार्यवाही करण्यात येते.
२. अन्न व औषध प्रशासनाच्या वांद्रे (पूर्व) मुंबई कार्यालयाच्या चौथ्या मजल्याचे बांधकाम करणे.
३. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते बाले उत्तर शिव रस्ता तळोजा पंचानन ते निळजे कि.मी.५२/८०० ता. पनवेल, जिल्हा. रायगड येथे रेल्वे क्रॉसिंग क्र. ६ ई रेल्वे ई.पी.नं. ५२/१३-१४ येथे रेल्वे उडडाण पुलाचे बांधकाम करणे,
४. भिवंडी रोड ते खारबाव रोड या रेल्वे स्थानकाच्या मध्ये खारबाव ग्रामीण रस्ता क्र.२४३ या राष्ट्रीय महामार्ग क्र.३ ला जोडणा-या रस्त्यावर लेव्हल क्रॉसिंग क्र.६ वर रेल्वे कि.मी. ६३/४०० ता.भिवंडी, जि.ठाणे येथे रेल्वेपुलाचे बांधकाम करणे.
५. राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते पिसर्वे रस्ता (इजीमा १०) रेल्वे क्रॉसिंग क्र. ९ (सी) भाग निळजे ते तळोजा पंचानन कि.मी. ५५/८००, ता. पनवेल, जि. रायगड येथे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे.
६. जोगेश्वरी येथील पादचारी पुलाचे बांधकाम करणे.
७. गोरेगांव येथील आरे उड्डाण पूल येथील भुयारी मार्गाचे काम करणे.
८. हुडको, एल.आय.सी.,एम.एस.आर.डी.सी. यांचे लोन व सबसिडी अदा करणे.
९. सायन पनवेल येथील तुर्भे उड्डाण पुलाचे मजबुतीकरण करणे.
१०. पश्चिम द्रुतगती मार्ग (द्रुतगती मार्ग क्र. ६) कि.मी.५२७/६८० कि.मी.५०२/३५० ची हायब्रीड अन्युईटी अंतर्गत सल्लागाराकडून प्रकल्प अहवाल तयार करणे.

तसेच मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभागाची रचना सोबत जोडलेल्या परिशिष्ट ‘अ’ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

## ४. विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.

### अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

विभागाकडील कामांबाबतच्या विभागास प्राप्त धारिकांचा निपटारा विहित वेळेत होणेबाबत लक्ष पुरविण्यात येते.

तसेच जनतेच्या तक्रारी, माहितीचा अधिकार, मासिक/त्रैमासिक अहवालांची माहिती याबाबत आवश्यकतेनूसार तत्परतेने कार्यवाही करण्यात येते.

### ब) माहितीची सुलभता

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल. याकडे लक्ष पुरविण्यात येते.

### क) खाजगीकरण

प्रश्न उद्भवत नाही.

## ५. विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.

प्रश्न उद्भवत नाही.

## ६. गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची सुचना.

### अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण

विभागाबाबत अथवा काही कामांबाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे तक्रार नोंदवावी अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण या कार्यालयाकडून विहित करण्यात येईल. गाऱ्हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. या कार्यालयातील व कार्यालयाच्या परिक्षेत्रासाठी माहिती अधिकारी श्रीमती गायत्री प्र. मेश्राम, सहाय्यक अभियंता श्रेणी-१ असून अपिलीय अधिकारी श्री. किशोर पं. पाटील, कार्यकारी अभियंता आहेत.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा **ई-मेल (eerdd1mum@ rediffmail.com)** द्वारेही नागरिक मांडू शकतात. गाऱ्हाणी मांडण्यास संबंधीत नागरीक भाषीक/प्रांतीक व इतर कोणत्याही कारणाने अक्षम असल्यास त्यास आवश्यक ते सहकार्य सर्वतोपरी उपलब्ध करण्याचा प्रयत्न हे कार्यालय करेल.

### ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा विशेष प्रकल्प सा.बां.विभाग, मुंबई अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

## क) जनसामान्यांकडून सुचना

ह्या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ७. <u>नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ह्या प्रादेशिक विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १ जून, २००७ पासून करण्यास मंडळ कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा (पूर्व), मुंबई खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ह्या प्रादशिक विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरित प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करता येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

## ८. परिशिष्टे

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता - परिशिष्ठ 'अ'

# “परिशिष्ट - अ”

## कार्यकारी अभियंता

**मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्रमांक १, वडाळा (पूर्व), मुंबई**

⇓

**उप कार्यकारी अभियंता**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व प्रकल्प उपविभाग क्र.१, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. | उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व प्रकल्प उपविभाग क्र.२, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. | उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व प्रकल्प उपविभाग क्र.३, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. | उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र उपविभाग क्र.५, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. | उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र उपविभाग क्र.८, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. | उप अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र उपविभाग क्र.९, वडाळा (पूर्व), मुंबई-३७. |

# परिशिष्ट - अ

**अधीक्षक अभियंता**
**मुंबई बांधकाम मंडळ,**
**चेंबूर (पू.), मुंबई-७१**

कार्यकारी अभियंता
मुंबई रस्ते विकास व
संकल्पचित्र
विभाग क्र.१, वडाळा (पू.),
मुंबई-३७.

# परिशिष्ट – ब


Mumbai
North Mumbai
Central Mumbai
South Mumbai
मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर मुंबई
मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा (पूर्व), मुंबई

# परिशिष्ट – क

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | -- | -- | -- |
| २. | -- | -- | -- |